बैंक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बैंक

Corporate Communications & Investor Relations
Head Office: LOKMANGAL, SHIVAJINAGAR, PUNE-5
TELE -020 :25614495, 25614366, 25514501 to 12 Extn. 495

**20-01-2022**

# वृत्तपत्रीय निवेदन

## दिनांक 31 डिसेंबर 2021 रोजी संपलेल्या तिमाही आणि नऊ महिन्यांचे आर्थिक निकाल

**दृष्टिक्षेपात निकाल**

**डिसेंबर 2021 रोजी संपलेली तिमाही आणि डिसेंबर 2022 रोजी संपलेली तिमाही यांची तुलना.**

- एकूण व्यवसायात 18.27% इतकी वाढ होऊन तो रु. 3,15,620 कोटी इतका झाला.
- एकूण ठेवींमध्ये 15.21% इतकी वाढ होऊन त्या रु. 1,86,614 कोटी इतक्या झाल्या.
- CASA (चालू खाते / बचत खाते) यात 24.60% वाढ झाली व त्यांची पातळी 55.05% पर्यंत गेली.
- एकूण कर्जे 22.98% वाढून ती रु.1,29,006 कोटी इतकी झाली.
- एकूण थकीत कर्जे दिनांक 31-12-2021 ला 4.73% पर्यंत कमी झाली.
- निव्वळ थकीत कर्जे दिनांक 31-12-2021 ला 1.24% पर्यंत कमी झाली.
- संरक्षक तरतूद गुणोत्तर (प्रोव्हिजन कव्हरेज रेशिओ) 93.77% पर्यंत सुधारला.
- निव्वळ नफा 110.70% वाढून तो रु. 325 कोटी इतका झाला.
- कार्यान्वयन नफा 28.21% वाढून रु. 1,162 कोटी इतका झाला.
- व्याजाचे निव्वळ उत्पन्न 16.90% वाढून ते रु. 1,527 कोटी झाले.
- व्याजाचे निव्वळ प्रमाण 31-12-2021 ला 3.11% इतके सुधारले.
- खर्च व उत्पन्न यांचे गुणोत्तर 45.63% पर्यंत सुधारले.
- मालमत्तेवरील परतावा 0.60% इतका सुधारला.
- भांडवल पर्याप्तता गुणोत्तर (CRAR) 14.85% इतके सुधारले. त्यापैकी स्तर 1 भांडवल (टायर-1) 10.61% आहे.

**नफाक्षमता (31 डिसेंबर 2021 रोजी संपलेली तिमाही)**

- गतवर्षीच्या तुलनेत निव्वळ नफ्यात 110.70% वाढ होऊन तो आर्थिक वर्ष 22 च्या तिसऱ्या तिमाहीत रु. 325 कोटी झाला, जो आर्थिक वर्ष 21 च्या तिसऱ्या तिमाहीत रु. 154 कोटी होता. मागील तिमाहीच्या तुलनेत त्यात 23.12% वाढ झाली.
- गतवर्षीच्या तुलनेत कार्यान्वयन नफ्यामध्ये 28.21% वाढ झाली. आर्थिक वर्ष 22 च्या तिसऱ्या तिमाहीत कार्यान्वयन नफा रु. 1,162 कोटी आहे जो आर्थिक वर्ष 21 च्या तिसऱ्या तिमाहीत रु. 907 कोटी होता.
- व्याजाच्या निव्वळ उत्पन्नात गतवर्षीच्या तुलनेत 16.90% वाढ झाली. आर्थिक वर्ष 22 च्या तिसऱ्या तिमाहीत व्याजाचे निव्वळ उत्पन्न रु. 1,527 कोटी आहे, जे आर्थिक वर्ष 21 च्या तिसऱ्या तिमाहीत रु. 1,306 कोटी होते. मागील तिमाहीच्या तुलनेत त्यात 27.32% इतकी वाढ झाली.
- एकूण उत्पन्न (व्याजाचे निव्वळ उत्पन्न अधिक इतर उत्पन्न) आर्थिक वर्ष 22 च्या तिसऱ्या तिमाहीत, आर्थिक वर्ष 21 च्या तिसऱ्या तिमाहीच्या रु. 1,881 कोटीच्या तुलनेत 13.68% वाढून ते रु. 2,138.04 कोटी झाले.

- शुल्क आधारित उत्पन्नामध्ये गतवर्षीच्या तुलनेत 6.51% वाढ झाली. आर्थिक वर्ष 22 च्या तिसऱ्या तिमाहीमध्ये ते रु. 305 कोटी इतके झाले.
- व्याजाव्यतिरिक्त उत्पन्नामध्ये गतवर्षीच्या तुलनेत 6.35% वाढ झाली. आर्थिक वर्ष 22 च्या तिसऱ्या तिमाहीत ते रु. 611 कोटी इतके आहे.
- खर्च व उत्पन्न गुणोत्तरात गतवर्षीच्या तिसऱ्या तिमाहीच्या 51.79% च्या तुलनेत आर्थिक वर्ष 22 च्या तिसऱ्या तिमाहीत 45.63% इतकी सुधारणा झाली. 30-9-2021 रोजी संपलेल्या तिमाहीत ते 39.96% इतके होते.
- मालमत्तेवरील परताव्यामध्ये आर्थिक वर्ष 22 च्या तिसऱ्या तिमाहीत 0.60% इतकी सुधारणा झाली. परताव्याचे प्रमाण आर्थिक वर्ष 21 च्या तिसऱ्या तिमाहीमध्ये 0.34% आणि आर्थिक वर्ष 22 च्या दुसऱ्या तिमाहीत 0.53% होते.
- भांडवलावरील परताव्यामध्ये देखील आर्थिक वर्ष 22 च्या तिसऱ्या तिमाहीत 13.49% इतकी सुधारणा झाली. भांडवलावरील परताव्याचे प्रमाण आर्थिक वर्ष 21 च्या तिसऱ्या तिमाहीत 7.91% आणि आर्थिक वर्ष 22 च्या दुसऱ्या तिमाहीत 11.45% होते.

**नफाक्षमता (31 डिसेंबर 2021 रोजी संपलेले नऊ महिने)**

- गतवर्षीच्या तुलनेत निव्वळ नफ्यामध्ये 106.75% वाढ. आर्थिक वर्ष 22 च्या नऊ महिन्यात रु. 796 कोटी निव्वळ नफा, जो 31-12-2020 रोजी संपलेल्या नऊ महिन्यात रु. 385 कोटी होता.
- कार्यान्वयन नफ्यामध्ये गतवर्षीच्या तुलनेत 51.68% वाढ. दिनांक 31-12-2021 रोजी संपलेल्या नऊ महिन्यात कार्यान्वयन नफा रु.3,669 कोटी होता, जो दिनांक 31-12-2020 रोजी संपलेल्या नऊ महिन्यात रु. 2,419 कोटी होता.
- व्याजाच्या निव्वळ उत्पन्नात गतवर्षीच्या तुलनेत 26.12% वाढ. दिनांक 31-12-2021 रोजी संपलेल्या नऊ महिन्यात हे उत्पन्न रु. 4,432 कोटी आहे, जे दिनांक 31-12-2020 रोजी संपलेल्या नऊ महिन्यात रु. 3,514 कोटी आहे.
- एकूण उत्पन्न (व्याजाचे निव्वळ उत्पन्न अधिक इतर उत्पन्न) 33.79% ने वाढले. दिनांक 31-12-2021 रोजी संपलेल्या नऊ महिन्यात ते रु. 6,563 कोटी आहे, जे दिनांक 31-12-2020 रोजी संपलेल्या नऊ महिन्यात रु. 4,905 कोटी होते.
- शुल्क आधारित उत्पन्नात गतवर्षीच्या तुलनेत 20.86% वाढ होऊन दिनांक 31-12-2021 रोजी संपलेल्या नऊ महिन्यात ते रु. 861 कोटी झाले.
- व्याजाव्यतिरीक्त उत्पन्नामध्ये गतवर्षीच्या तुलनेत 53.18% वाढ होऊन दिनांक 31-12-2021 रोजी संपलेल्या नऊ महिन्यात ते रु. 2,130 कोटी झाले.
- खर्च व उत्पन्न गुणोत्तरात सुधारणा – 31-12-2021 रोजी संपलेल्या नऊ महिन्यात 44.09%, जे 31-12-2020 रोजी संपलेल्या नऊ महिन्यात 50.69% होते.
- मालमत्तेवरील परताव्यामध्ये सुधारणा - 31-12-2021 रोजी संपलेल्या नऊ महिन्यात परताव्याचे प्रमाण 0.52% होते, जे 31-12-2020 रोजी संपलेल्या नऊ महिन्यात 0.28% होते.
- भांडवलावरील परताव्यामधे देखील सुधारणा - 31-12-2021 रोजी संपलेल्या नऊ महिन्यात परताव्याचे प्रमाण 11.21%, जे 31-12-2020 रोजी संपलेल्या नऊ महिन्यात 7.00% होते.

**येणी व देणी**

- एकूण व्यवसायात गतवर्षीच्या तिसऱ्या तिमाहीच्या तुलनेत 18.27% वाढ होऊन तो रु. 3,15,620 कोटी झाला. मागील तिमाहीच्या तुलनेत त्यात 6.34% वाढ झाली.

- एकूण ठेवींमध्ये गतवर्षीच्या तिसऱ्या तिमाहीच्या तुलनेत 15.21% वाढ होऊन त्या रु. 1,86,614 कोटी इतक्या झाल्या.
- एकूण कर्जांमधे गतवर्षीच्या तुलनेत 22.98% वाढ झाली. आर्थिक वर्ष 22 च्या तिसऱ्या तिमाहीमध्ये ती रु. 1,29,006 कोटी आहेत, जी आर्थिक वर्ष 21 च्या तिसऱ्या तिमाहीत रु. 1,04,904 कोटी होती.
- निव्वळ कर्जे गतवर्षीच्या तिसऱ्या तिमाहीच्या तुलनेत 25.18% वाढून आर्थिक वर्ष 22 च्या तिसऱ्या तिमाहीमध्ये ती रु. 1,24,425 कोटी आहेत.
- RAM (Retail, Agri & MSME) किरकोळ, कृषि आणि लघुउद्योगांशी संबंधित व्यवसाय गतवर्षीच्या तुलनेत 18.06% ने वाढून तो रु.32,743 कोटी झाला. सूक्ष्म व लघुउद्योगांची कर्जे गतवर्षीच्या तुलनेत 23.57% वाढून ती आर्थिक वर्ष 22 च्या तिसऱ्या तिमाहिमध्ये रु. 25,091 कोटी झाली.

## भांडवल पर्याप्तता

- आर्थिक वर्ष 22 च्या तिसऱ्या तिमाहीसाठी एकूण बेसेल 3 भांडवल पर्याप्तता गुणोत्तर 14.85% इतके सुधारले. त्यात सर्वसाधारण स्तर 1 भांडवल प्रमाण आर्थिक वर्ष 22 च्या तिसऱ्या तिमाहिसाठी 10.61% आहे.
- तरलता तरतूद गुणोत्तर 210.01% आहे, जे नियामकांच्या 100% आवश्यकतेपेक्षा खूपच जास्त आहे.
- बँकेने ऑक्टोबर 21 मध्ये भारतीय विमा महामंडळाला (एल.आय.सी. ऑफ इंडिया) रु. 1,000 कोटीचे स्तर 2 रोखे पारीत केले आहेत.

## संपत्ती गुणवत्ता

- एकूण थकित कर्जांचे प्रमाण दिनांक 31-12-2021 रोजी 4.73% इतके कमी झाले, जे दिनांक 31-12-2020 रोजी 7.69% आणि 30-9-2021 रोजी 5.56% होते.
- निव्वळ थकित कर्जांचे प्रमाण दिनांक 31-12-2021 रोजी 1.24% इतके झाले, जे दिनांक 31-12-2020 रोजी 2.59% आणि 30-9-2021 रोजी 1.73% होते.
- संरक्षक तरतूद गुणोत्तर (प्रोव्हिजन कव्हरेज रेशिओ) दिनांक 31-12-2021 रोजी 93.77% इतका सुधारला. दिनांक 31-12-2020 रोजी ते 89.55% आणि 30-9-2021 रोजी ते 92.38% होते.
- दिनांक 31-12-2021 रोजी बँकेकडे एकूण रु. 1,073 कोटी कोव्हिड-19 तरतूद आहे.

**नफा क्षमता** (रु. कोटी)

| तपशील | समाप्त तिमाही | | | बदल (%) | |
|---|---|---|---|---|---|
| | डिसेंबर 20 | सप्टेंबर 21 | डिसेंबर 21 | वर्ष ते वर्ष | तिमाही ते तिमाही |
| एकूण उत्पन्न | 3,582 | 4,039 | 3,893 | 8.7 | (3.61) |
| एकूण खर्च | 2,675 | 2,639 | 2,731 | 2.09 | 3.46 |
| कार्यान्वयन नफा | 907 | 1,400 | 1,162 | 28.21 | (16.96) |
| तरतुदी व आकस्मिकता (कर वगळून) | 502 | 855 | 752 | 49.79 | (11.98) |
| करपूर्व नफा | 404 | 545 | 410 | 1.41 | (24.76) |
| कर खर्च | 250 | 281 | 86 | (65.84) | (69.61) |
| निव्वळ नफा | 154 | 264 | 325 | 110.7 | 23.12 |

**शीर्ष व्यवसाय** (रु. कोटी)

| तपशील | रोजी | | वृद्धी% |
|---|---|---|---|
| | डिसेंबर २० | डिसेंबर २१ | वर्ष ते वर्ष |
| एकूण व्यवसाय | 2,66,875 | 3,15,620 | 18.27 |
| ठेवी | 1,61,971 | 1,86,614 | 15.21 |
| त्यापैकी CASA | 82,452 | 1,02,732 | 24.6 |
| एकूण ठेवींमध्ये CASA ठेवींचे प्रमाण% | 50.91 | 55.05 | |
| एकूण कर्जे | 1,04,904 | 1,29,006 | 22.98 |

**ताळेबंद**
**दायित्वे** (रु. कोटी)

| तपशील | रोजी | |
|---|---|---|
| | डिसेंबर २० | डिसेंबर २१ |
| भांडवल | 6,560 | 6,731 |
| गंगाजळी | 5,411 | 6,603 |
| ठेवी | 1,61,971 | 1,86,614 |
| कर्जे | 4,765 | 16,140 |
| अन्य दायित्वे व तरतुदी | 5,375 | 5,258 |
| एकूण | 1,84,082 | 2,21,344 |

**मालमत्ता**

| तपशील | रोजी | |
|---|---|---|
| | डिसेंबर २० | डिसेंबर २१ |
| भारतीय रिझर्व्ह बँकेकडील रोख व ठेवी | 7,571 | 13,969 |
| इतर बँकांकडील ठेवी व अल्प सूचनेवरील रक्कम | 74 | 110 |
| गुंतवणुकी | 64,091 | 71,745 |
| कर्जे निव्वळ | 99,401 | 1,24,425 |
| स्थिर मालमत्ता | 1,661 | 1,597 |
| इतर मालमत्ता | 11,284 | 9,498 |
| एकूण | 1,84,082 | 2,21,344 |

**गुंकवणूकदारांसाठी सादरीकरण बँकेच्या** www.bankofmaharashtra.in **या संकेतस्थळावर उपलब्ध आहे**.

***